साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १२ वे, अंक – चौथा; जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२

**UGC Care Listed Journal**
**ISSN 2231 - 573X**

● संपादक ●
## डॉ. शिवाजी हुसे
पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३.
मो. ९९०४००३९९८

UGC Care Listed Journal  ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC

## मूर्तिशिल्प, कला व स्थापत्य विशेषांक

वर्ष  १२ वे, अंक – चौथा; जानेवारी-फेब्रुवारी-मार्च २०२२

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

● अतिथी संपादक ●
डॉ. जगदीश व्यंकटराव भेलोंडे

● संपादक मंडळ ●

| | | |
|---|---|---|
| डॉ. सर्जेराव जिगे | डॉ. ताहेर पठाण | डॉ. ममता इंगोले |
| डॉ. फुला बागूल | डॉ. वंदना महाजन | डॉ. वामन जाधव |
| डॉ. अनिल गर्जे | डॉ. रामचंद्र झाडे | डॉ. यशवंत सोनुने |

मूल्य : २०० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, ‘शिवार’, श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३. मो. ९९०४००३९९८

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| 1. | **प्राचीन भारतीय मूर्तिकला निर्मितीची साधने**<br>- डॉ. सीमा नवनाथ इंदलकर | 1 - 5 |
| 2. | **मार्कंडा मंदिराचा ऐतिहासिक अभ्यास**<br>- प्रा. जयवंत एन. काकडे | 6 - 12 |
| 3. | **मराठवाड्यातील मंदिर स्थापत्यातील मूर्ती व शिल्प**<br>- डॉ. आर आर पिंपळपल्ले - सोनाळे सरस्वती निवृत्ती | 13 - 18 |
| 4. | **हेमाडपंती मंदिरांची स्थापत्य शैली**<br>- प्रा.डॉ. कोंडेकर आर. एस. | 19 - 23 |
| 5. | **अजिंठ्यातील भित्तीचित्रामध्ये दडलेला निवडक जातककथांचा नाट्यपूर्ण कथाविस्तार : एक अभ्यास**<br>- डॉ. वैशाली केशव बोदेले | 24 - 28 |
| 6. | **राजा गंधर्वसेनाच्या मूर्तीची वास्तविकता एक अभ्यास**<br>- डॉ. अस्मिता हवालदार | 29 - 36 |
| 7. | **मानसपूरी (कंधार) येथील मूर्ती शिल्पातील भव्यशिल्प : भैरव क्षेत्रपाल** - डॉ. राजाराम रा पिंपळपल्ले | 37 - 40 |
| 8. | **शिवकालीन किल्ले व किल्ले व्यवस्थापन**<br>- प्रा. डॉ. विद्यासागर पू. सोनकांबळे | 41 - 43 |
| 9. | **मुघल स्थापत्यकलेचा उत्कृष्ट भव्य नमुना - हुमायूँचा मकबरा**<br>- डॉ. अनिता शिंदे | 44 - 47 |
| 10. | **मराठेकालीन किल्ले स्थापत्यशास्त्र**<br>- डॉ. शिला कमलाकर स्वामी | 48 - 50 |
| 11. | **स्थापत्य शास्त्राचा उत्कृष्ट नमुना - किल्ले सोलापूर**<br>- श्रीमती मंजुषा कमलाकर स्वामी | 51 - 53 |
| 12. | **चलनी नाण्याचा उगम**<br>- श्री शैलेश सदाशिव सावे | 54 - 59 |
| 13. | **कन्नड तालुक्यातील दुर्लक्षित अंतूर किल्ल्याचा अभ्यास**<br>- प्रा. डॉ. संजय वाकळे | 60 - 63 |
| 14. | **सिंधू संस्कृतीकालीन- शिल्पकला / मुर्तीकला**<br>- प्रा.डॉ.युलिसिस एकनाथ भालेराव | 64 - 67 |

| | | |
|---|---|---|
| 15. | **कंधार तालुक्यातील मानसपूरी येथील जैन मुर्ती**<br>- प्रा.डॉ.गिरे संजय भाऊराव | 68 - 71 |
| 16. | **शिल्प व स्थापत्य कलेतील वडार समाजाचे योगदान**<br>- सौ. विजयालक्ष्मी देवगोजी व डॉ. मनीषा नेसरकर | 72 - 78 |
| 17. | **बुद्धमूर्तीतील हस्तमुद्रा: एक सम्यक बोध**<br>- प्रा.डॉ. अरविंद म. पुनवटकर | 79 - 84 |
| 18. | **शिवकालीन किल्ले स्थापत्य**<br>- प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने | 85 - 88 |
| 19. | **रहस्यमय बुद्ध मुद्रा - थोडक्यात आढावा**<br>- ऐश्वर्या उमाकांत ठेंगे | 89 - 91 |
| 20. | **नृसिंहाची यक्ष परंपरा आणि त्याचा उगम...**<br>- पृथ्वीराज निलेश धवड | 92 – 98 |
| 21. | **लोकदेव क्षेत्रपाळ श्री रवळनाथ ही कथा**<br>- प्रकाश भाऊ नारकर | 99 - 104 |
| 22. | **छत्रपती शिवाजी महाराजांच्या गड-किल्ल्यावरील श्रीगणेश**<br>- डॉ. मधुकर विठोबा जाधव | 105 - 108 |
| 23. | **वाकाटक व राष्ट्रकूटकालीन शिल्पस्थापत्य व चित्रकला : एक अभ्यास**<br>- प्रा. डॉ. सुषमा देशपांडे | 109 - 111 |
| 24. | **शिवकालीन गिरीदुर्ग स्थापत्य**<br>- प्रा.डॉ. शिल्पा शेटे | 112 - 117 |
| 25. | **मृग व्याधेश्वर मंदिराची आख्यायिका आणि वास्तविकता**<br>- डॉ. भावना श्रीपती पौळ | 118 - 121 |
| 26. | **सतीशीळा आणि सतीप्रथेचा इतिहास**<br>- श्री अनिल किसन दुधाने | 122 - 128 |
| 27. | **शिल्पकलेच्या अभ्यासासाठी डिजीटल पुनर्रुजीवन**<br>- रवीन्द्र बोरावके | 129 - 132 |
| 28. | **राणीसावरगाव येथील ऐतिहासिक स्थळाचा व हेमाडपंथीय मंदिर स्थापत्याचा अभ्यास** - डॉ. गणेश माने | 133 - 137 |
| 29. | **कंधार येथील प्राचीन बौध्द स्थापत्याचा थोडक्यात आढावा**<br>- अमोल सुदामराव श्रीखंडे | 138 - 140 |

| | | |
|---|---|---|
| 30. | **यादव कालीन नेवासा तालुक्यातील काळेगावच्या ताम्रपटाचा अभ्यास : एक दृष्टिक्षेप** - डॉ. संभाजी दराडे | 141 - 145 |
| 31. | **प्राचीन शिल्पकलेचा भारतीय वारसा**<br>- डॉ. प्रभाकर गणपत गावंड | 146 - 150 |
| 32. | **वीरगळ (वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर)**<br>- सौ सुजाता सचिन देशमुख | 151 - 154 |
| 33. | **बौद्ध धर्मिय स्थापत्य कला : स्तूप**<br>- डॉ. बाळासाहेब भिमराव अंभोरे | 155 - 159 |
| 34. | **यवतमाळ शहरातील हेमाडपंती स्थापत्य - शिवालय**<br>- कु. भाग्यश्री श्रीकृष्णराव गाडगे | 160 - 164 |
| 35. | **भारतीय स्थापत्य कला शैली प्रकारांचा एक अभ्यास**<br>- डॉ. डी. डी. कोल्हेकर | 165 - 169 |
| 36. | **भारतीय कलेत शक्ती उपासना**<br>- डॉ.विवेकानंद लक्ष्मण चव्हाण | 170 - 175 |
| 37. | **वास्तुसार प्रकरणातील चित्रित बिंबपरीक्षा**<br>- महावीर सुरेश पाटील | 176 - 181 |
| 38. | **सातवाहन कालीन कला व स्थापत्य**<br>- डॉ. शिला सखाराम सहाने | 182 - 185 |
| 39. | **महायान पंथाच्या प्रसारामुळे लेणी स्थापत्यकलेवर पडलेला प्रभाव**<br>- कृष्णा अर्जुन गावित | 186 - 189 |
| 40. | **पूर्व मध्यकालीन महाराष्ट्रातील स्थापत्याचा नागरी परिप्रेक्ष्यातून अभ्यास**<br>- प्रा. डॉ. मरे राजकुमार श्रीहरी | 190 - 194 |
| 41. | **मरळक येथील विमलेश्वर चे पुरातन मंदिर**<br>- लेफ्ट. डॉ. पावडे खोब्राजी वामनराव | 195 - 197 |
| 42. | **अंधकासुर वध दशावतार लेणे, वेरूळ**<br>- सूर्यकांत फकिरा जाधव, प्रा.डॉ. शिरीष आंबेकर | 198 - 202 |
| 43. | **भारतीय स्थापत्य समृद्धीची विविधता शोध आणि सीमा जागतीक भारतीय शिल्पकलेचा** - नंदकिशोर सैंदाणे पितांबर | 203 - 208 |
| 44. | **लातूर जिल्ह्यातील खरोसा बौध्दलेणी एक ऐतिहासिक अवलोकन**<br>- प्रा.डॉ. बालाजी मारूती गव्हाळे | 209 - 212 |
| 45. | **कंधार परिसरातील जैन सर्वतोभद्र मूर्ती** | 213 - 215 |

| | | |
|---|---|---|
| | - डॉ. चंदन एम. बावलगावे | |
| 46. | **मध्ययुगीन दक्षिण भारतातील मशिद स्थापत्य शिल्प**<br>- शेख इस्माईल महेबुब | 216 - 219 |
| 47. | **मराठवाडयातील वारकरी संप्रदाय आणि मुर्तिशास्त्राचे महत्व**<br>- दिपीका हिम्मत पवार | 220 - 222 |
| 48. | **महाराष्ट्रातील वास्तुशिल्पाचा प्रवास : प्राचीनकाळ ते मराठेशाहीपर्यंत** - Dr. Mubaraque Quraishi | 223 - 229 |
| 49. | **वज्रयान पंथातील स्त्रीप्रतीमांचे समाजशास्त्रीय विश्लेषण**<br>- कल्पना उत्तम म्हस्के | 230 - 234 |
| 50. | **पुंगळा येथील हेमाडपंती शैलीतील मंदिः**<br>- प्रा.उद्धव उमाजी राऊत | 235 - 236 |
| 51. | **गुप्तेश्वर मंदिर स्थापत्याचा अभ्यास**<br>- डॉ. कामाजी डक व प्रा. पुष्पा गायकवाड | 237 - 241 |
| 52. | **बौध्द धर्मातील बुध्दप्रतिमा व मुद्रांचा अभ्यास**<br>- सोनिया वामनराव डावरे व डॉ. शिला स्वामी | 242 - 245 |
| 53. | **रायगड जिल्ह्यातील गांधारपाले लेण्यांचा शिल्पशैलीय अभ्यास** - प्रा. डॉ. एस.व्ही पाथरकर | 246 - 249 |
| 54. | **अहमदनगर जिल्ह्यातील मंदिरे**<br>- वृषाली संजय माळी | 250 - 255 |
| 55. | **माडगीहाळ येथील प्राचीन मंदिर आणि शिल्पकृती**<br>- डॉ. सचिन शिंदे | 256 - 259 |
| 56. | **भारतीय स्थापत्यकला आणि शिल्पकला : उदय आणि विकास** - प्रा.घाडगे शंकर धारबा | 260 - 263 |
| 57. | **सिंधू संस्कृतीतील वस्त्रे**<br>- विठ्ठल लक्ष्मण फुलारे व डॉ. भेलोंडे जे. व्ही. | 264 - 266 |
| 58. | **खामगाव तालुक्यातील मध्ययुगीन शिवमंदीरे: एक चिकित्सक अध्ययन** - डॉ.किशोर मारोती वानखडे | 267 - 273 |
| 59. | **सातारा जिल्ह्यातील धावडशी येथील ब्रह्मेंद्रस्वामी मंदिर : मराठा स्थापत्य शैलीचा उत्कृष्ट नमुना** - मच्छिंद्र रूपचंद चौधरी | 274 - 278 |
| 60. | **बोरगाव ता.वाळवा जि. सांगली येथील वीरगळचा इतिहास**<br>- प्रा. डॉ. चंपाताई श्रीरंग बोधले | 279 - 282 |

| | | |
|---|---|---|
| 61. | **धुळे जिल्हातील मेथी आणि बलसाणे येथील मंदिरे**<br>- डॉ. रमेश धनराज जाधव | 283-287 |
| 62. | **विष्णु मूर्ती**<br>- प्रा. गायकवाड बाळू भीमराव | 288 - 290 |
| 63. | **मौर्यकालीन स्थापत्यकला : एक चिकित्सक अभ्यास**<br>- प्रा. रविराज नामदेव कांबळे | 291 - 295 |
| 64. | **जिंजाळा किल्ल्याचे स्थापत्य - एक अभ्यास**<br>- नरसिंग रामराव चिट्टमवार | 296 - 299 |
| 65. | **मराठी स्थापत्याचे दिमाखदार रूप वाडा : स्थापत्य**<br>- श्रीमती स्नेहाली कुलकर्णी | 300 - 306 |
| 66. | **केदारेश्वर मंदिर, धर्मापुरी येथील निवडक अद्वितीय शिल्पे**<br>- श्री. मयुरेश खडके | 307 - 312 |
| 67. | **औरंगाबाद शहरातील बेगमपुरा येथील थत्ते नहर**<br>- श्रीमती धरती बालाजी येलगंटवार | 313 - 315 |
| 68. | **सातवाहन काळातील लेणी स्थापत्याचा आविष्कार**<br>- डॉ. प्रगती बी. मारकवार | 316 - 318 |
| 69. | **ब्रह्मशांती यक्ष**<br>- प्रा डॉ भानुसे के एल | 319 - 320 |
| 70. | **धर्मापूरी येथील दंतवक्रवध शिल्प– एक दुर्मीळ प्रतिमा**<br>- प्रा. डॉ. धम्मपाल माशाळकर | 321 - 324 |
| 71. | **मौर्यकालीन वास्तुकला एक अभ्यास**<br>- वाघ जालिंदर पांडुरंग | 325 - 330 |
| 72. | **मुघल स्थापत्यकला : फतेहपुर सिक्रीच्या विशेष संदर्भासह**<br>- प्रा. रुचिरा विकास दंडगव्हाळ | 331 - 335 |
| 73. | **श्री लक्ष्मीसेन जैन मठ करवीर व मानस्तंभ : एक ऐतिहासिक दृष्टीकोन** - डॉ. बाळासाहेब आमगोंडा कोटलगी | 336 - 341 |
| 74. | **ग्वाल्हेर येथील जैन शैलगृह**<br>- प्रा डॉ प्रकाश महाजन | 342 - 344 |
| 75. | **किल्ल्यांचा सामाजिक संदर्भ**<br>- डॉ.शैलेश भिमराव राऊत | 345 - 347 |

| | | |
|---|---|---|
| 76. | **औरंगाबाद शहरातील भडकल दरवाजा - स्थापत्यशास्त्रीय विवेचन**<br>- आकाश जनार्धन बोकडे | 348 - 351 |
| 77. | **किल्ले रामशेजवरील जलव्यवस्थापन**<br>- गोरख शिवाजी शेवाळे | 352 - 354 |
| 78. | **ऐतिहासिक किल्ले नळदुर्ग : जतन व संवर्धन**<br>- दादासाहेब जगन्नाथ कांबळे | 355 - 357 |
| 79. | **वेरूळ लेणीतील बौध्द स्त्री देवता**<br>- डॉ. शिरिष पवार | 358 - 360 |
| 80. | **वेरूळ बौध्द लेणीतील महामयुरीचे शिल्प**<br>- डॉ. आशोक कानडे | 361 - 362 |
| 81. | **वेरूळ बौध्द लेणीतील मनुषी बुध्द**<br>- अर्जुन गंगाराम पट्टेकर | 363 - 364 |
| 82. | **अजिंठा लेणीतील बुध्द व राहुल यांचे शिल्प**<br>- सुरेश महादेव मादळे | 365 - 367 |
| 83. | **कान्हेरी लेणीतील पद्मपाणी अवलोकितेश्वर**<br>- डॉ. सचिन बनसोडे | 368 - 369 |
| 84. | **अजिंठा लेणीतील यक्ष**<br>- डॉ. संजय पाईकराव | 370 - 371 |
| 85. | **धारकुंड येथील दुर्लक्षित लेणी**<br>- डॉ. नम्रता दिलीप भोसले | 372 - 374 |
| 86. | **सोलापूर जिल्ह्यातील दुर्लक्षित वीरगळ**<br>- डॉ. किरण काळे | 375 - 377 |
| 87. | **भामनेर मावळाला कल्याणशी जोडणारा घाटरस्ता : अंबालिक विहार आणि इतर स्थान वैशिष्टे** - गणेश फलके | 378 - 381 |
| 88. | **सांची येथील स्तूपाच्या महिला देणगीदार आणि बौद्ध धर्मातील लिंगभाव समानता** - डॉ. जगदीश छबूराव सोनवणे | 382 - 385 |
| 89. | **लेण्यातील चित्रशिल्पातून प्रतिबिंबीत समाजजीवनाचा चिकित्सक अभ्यास** - दिग्वीजय सुरेश सोनोने | 386 - 390 |
| 90. | **प्राचीन भारतीय मंदिर स्थापत्य**<br>- लेफ्ट. डॉ. अर्चना टाक | 391 - 394 |

| | | |
|---|---|---|
| 91. | **अजिंठा बौद्ध लेण्यांतील विकसीत स्थापत्य कलेचा अभ्यास**<br>- प्राची सुधाकर भोसले | 395 - 400 |
| 92. | **बोरसर येथील वाडे स्थापत्य**<br>- डॉ. टी. आर पाटील | 401 - 403 |
| 93. | **बौद्ध लेण्यातील नखशिल्पाचा चिकित्सक अभ्यास**<br>- शुभांगी राजकुमार कांबळे | 404 - 408 |
| 94. | **अजिंठा  लेणीतून प्रतिबिंबीत बौध्द संस्कृती**<br>- स्नेहा सुरेश सोनवणे | 409 - 414 |
| 95. | **नांदेड जिल्हयातील कंधारच्या राष्ट्रकुटकालीन किल्ल्याचे स्थापत्य : एक अवलोकन** - डॉ. शिवराज चंद्रकांत बोकडे | 415 - 420 |
| 96. | **बौद्ध बांधीव स्तूपांवरील प्रतीकांचा अभ्यास**<br>- श्री. अमोल अशोक कांबळे व डॉ. प्रभाकर ना. कोळेकर | 421 - 428 |
| 97. | **भारतीय मूर्तिकला आणि देवी प्रतिमा**<br>- प्रा. डॉ. श्वेता बा. चौधारे | 429 - 431 |
| 98. | **नहपान विहार : सातवाहन कालीन जागतिकीकरणाचे प्रतिक**<br>- प्रा. किर्ती विकास वर्मा | 432 - 435 |
| 99. | **भारतीय कला, शिल्पकला आणि वास्तुकलेचा देशाच्या विकसात मोलाचे स्थान** - Jitendra K. Pawar & Dr. S. S. Ambekar | 436 - 440 |



# सांची येथील स्तूपाच्या महिला देणगीदार आणि बौद्ध धर्मातील लिंगभाव समानता

**- डॉ. जगदीश छबूराव सोनवणे**

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सोनई, ता. नेवासा, जि. अहमदनगर ४१४१०२.

भ्रमणध्वनी : 9423210260, ई-मेल : sonawanejagdish31@gmail.com

सिद्धार्थ गौतम बुद्धाने इ. स. पू. सहाव्या शतकात मानवतेवर आधारित बौद्ध धर्माची स्थापना करून सर्वसामान्य जनतेमध्ये आपल्या तत्वज्ञानाचा प्रसार केला. इसवी सनाच्या सुरुवातीच्या शतकांमध्ये बौद्ध धर्म भारतात हिमालयाच्या काराकोरम पर्वतरांगांपासून दक्षिणेकडील कृष्णा खोऱ्यापर्यंतचा भागात चांगलाच विकासित झाला होता आणि लोकप्रिय धर्म होता. शांतता आणि करुणेचा संदेश देणाऱ्या या धर्माच्या प्रेमात केवळ भारतीय लोकच पडले असे नाही तर शक आणि कुशाण यांसारख्या परकीय आक्रमकांनीही सार्वत्रिक शांततेचे आवाहन करणाऱ्या बौद्ध धर्माला उत्सुकतेने स्वीकारले होते.भारतात सिद्धार्थ गौतम बुद्धाच्या काळापासूनच बौद्ध धर्माला राजाश्रय आणि लोकाश्रय मिळालेला दिसून येतो. भारताच्या उत्तरेपासून दक्षिणेकडील तसेच पूर्व आणि पश्चिमेकडील मोठ्या भूभागावर सर्वत्र आढळून येणाऱ्या बौद्ध स्मारके, स्तूप, चैत्ये, विहार यावरून आपणास लक्षात येते की भारतीय जनतेमध्ये बौद्ध धर्म हा अतिशय लोकप्रिय धर्म होता. या काळात लोकांनी उत्स्फूर्तपणे दिलेल्या देणग्यातून ही स्मारके सुशोभित, विस्तारित आणि मोठी करण्यात आली. त्यापैकी बहुतेक स्मारके आजही सुस्थितीत पहावयास मिळतात.

बौद्ध धर्माचे सर्वात महत्वाचे स्मारक म्हणजे स्तूप, साधारणपणे भगवान बुद्धांच्या पवित्र अवशेषांवर हा स्तूप बांधला जातो. स्तूप सहसा चैत्य आणि विहारांनी वेढलेले असतात त्यामुळे ते एक मोठे धार्मिक संकुल बनते चैत्य आणि विहार ही बौद्ध भिक्खू आणि भिक्कुणी यांच्या शिक्षणासाठी आणि राहण्यासाठी उभारलेली ठिकाणे आहेत. तत्कालीन राजघराणी, बौद्ध धर्माचेसामान्य अनुयायी आणि सामान्य स्त्री-पुरुष यांच्या देणग्यांमुळेमोठ-मोठ्या इमारतींचे बांधकाम करणे शक्य झाले. म्हणूनच देणगीदारांच्या जाणीवपूर्वक केलेल्या नोंदी या बौद्ध स्मारकांचे वेगळे वैशिष्ट्य

दर्शवतात. या देणग्यांचे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे देणगी देणाऱ्यांमध्ये महिलांची संख्या मोठी आहे शिवाय,सांची, कान्हेरी, नाशिक आणि नागार्जुनकोंडा या बौद्ध स्थळांइतकी महिला देणगीदारांची संख्याभारतात इतरत्र कुठेही आढळून आलेली नाही. स्त्रियांनी दान केलेल्या भव्य शिलालेखांचा एक विशेष अभ्यास बौद्ध धर्म आणि त्याच्या महिला अनुयायांमधील घनिष्ठ संबंध दर्शवितो आणि हे एक अद्वितीय वैशिष्ट्य आहे जे सहसा भारतीय परंपरेत इतरत्र आढळत नाही. लिंगभाव समानता यावर आधारलेल्या बौद्ध धर्माचा आणि महिलांनी उत्स्फूर्तपणे केलेल्या दानाचा नक्कीच फार जवळचा संबंध असल्याचे लक्षात येते

सर्व बौद्ध स्थळांच्या बांधकामासाठी, विकासासाठीबौद्ध महिला अनुयायांनी दिलेले धार्मिक दान हे एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. या महिलांमध्ये भिक्कुणी, सामान्य अनुयायी, सामान्य महिला किंवा श्रीमंत कुटुंबातील महिलांनी आपापल्या क्षमतेनुसार दान केले आहे. कान्हेरी लेणीमध्ये महिलांनी दिलेल्या अनेक देणग्या नोंदवल्या आहेत. तेथे बुद्धरक्षिता नावाच्या शिक्षिकेने दान दिल्याचा उल्लेख आढळतो.[i] नाशिक येथेसातवाहन राणी गौतमी बलश्री आणि शक क्षत्रप राजा नहपण याची कन्या दक्षमित्रा यांनी दिलेले दान सापडले आहे.[ii] आंध्र प्रदेशातील नागार्जुनकोंडा हे बौद्ध धर्माच्या महिला अनुयायांच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचे ठिकाण आहे. हे या अर्थाने अद्वितीय आहे की जवळजवळ संपूर्णसंकुलाचे बांधकाम इक्षवाकू या राजघराण्यातील स्त्रिया आणि इतर श्रीमंत घराण्यातील स्त्रियांनी दिलेल्या देणगीतून साकारलेले आहे. सिरी विरापुरिसदत्त या राजाची चुलती चामतिसिरी ही या संकुलाची मुख्य देणगीदार आहे, जवळजवळ नऊ समर्पित स्तंभ शिलालेखांमध्ये तिचे नाव नमूद केलेले आपण पाहू शकतो आणि शिलालेखांमध्ये देणगीदार म्हणून इतर पाच शाही महिलांचाही उल्लेख आहे

महिलांनी केलेल्या दानाच्या संदर्भात सांचीहे सर्वात महत्त्वाचे बौद्ध संकुल आहे. हे ठिकाण मध्य प्रदेशातील भोपाळजवळील विदिशा या प्राचीन शहराच्या परिसरात वसलेले आहे. सांचीमध्ये दोन मुख्य स्तूप, एक मठ आणि एक बौद्ध मंदिर तसेच काही छोटे स्तूप आहेत. बुल्हेर (1894) यांनी असे 456 शिलालेख नोंदवले आहेत आणि नंतर मार्शलने सुमारे 827 देणगीदारांच्या नोंदी संकलित केल्या आहेत.[iii] सांचीचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे देणग्या मोठ्या प्रमाणात आहेत, परंतु स्तूपाच्या सुशोभिकरणासाठीया रकमा फारच कमी आहेत म्हणजे अल्प असून समाजाच्या विशिष्ट स्तरातून गरिब महिलांकडून आलेल्या आहेत आणि राजघराण्यांचे किंवा उच्च अधिकारी कुटुंबांचे प्रतिनिधित्व जवळजवळ शून्य आहे. म्हणून सांचीहे ठिकाण सामान्य स्तरातील महिला आणि बौद्ध धर्म यांच्यातील परस्पर संबंधांचेस्पष्ट चित्र रेखाटण्यासाठी सर्वात मौल्यवान ठेवा उपलब्ध करते.

मार्शलने संकलित केलेल्या 827 शिलालेखांपैकी 346 शिलालेखांमध्येमहिलांचे योगदान दिसून येते आहे. परंतु येथे हे लक्षात घ्यावे लागते की,बहुतेक शिलालेख खराब झालेले आहेत आणि त्यावरील फक्त एक किंवा दोन अक्षरे स्पष्टपणेदिसून येतात. एकूण संख्येतून हे अपात्र शिलालेख हटवल्यास महिला देणगीदारांची टक्केवारी आणखी वाढू शकते. सांची येथे, महिला देणगीदारांचे तीन मुख्य वर्ग आहेत, सामान्य महिला, ज्यांचे योगदान सर्वाधिक आहे, भिक्कुणी आणि अनुयायीतसेच सामान्य महिलाउपासक.

सांची या वस्तुस्थितीसाठी विशेष आहे की मोठ्या संख्येने महिलांनी स्वतंत्रपणेघराबाहेर पडून सार्वजनिकपणे त्यांच्या धार्मिक विश्वासाची घोषणा करणे हे भारतीय इतिहासात उल्लेखनीय आहे. यावरून असे लक्षात येते की, बौद्ध धर्मामध्येस्त्रियांना विशेष आदरचे स्थान देण्यात आले असून त्याच्या आवाहनाला महिलांनी भरभरून प्रतिसाद दिलेला आहे. तसेच यावरून हे देखील स्पष्ट आहे की बौद्ध धर्माच्या अंतर्गत स्त्रियांना निश्चितपणे चांगले स्थान मिळाले जरी स्वत: गौतम बुद्ध वैयक्तिकरित्या महिलांच्या क्षमतेवर आणि लैंगिक समानतेवर विश्वास ठेवत असले तरी सुरुवातीला ते महिलांना संघातप्रवेश देण्यास तयार नव्हते. परंतु महाप्रजापती गौतमी आणि शिष्य आनंद यांच्याआग्रहामुळे त्यांनी

शेवटी महिलांना संघात प्रवेश दिला बौद्ध तत्त्वज्ञान देखील स्त्री-पुरुष समानतेला अनुकूल आहे. बौद्ध धर्मात असे मानले जाते की स्त्रीला अर्हत, बोधिसत्व आणि तथागत यांसारखी उच्च उद्दिष्टे साध्य करण्याचा अधिकार आणि क्षमता आहे आणि ती महिलांसाठी देखील खुली आहेत. बौद्ध ग्रंथ असे सूचित करतात की,जात, पंथ आणि लिंग या सर्व भेदांवर मात करून कोणालाहीप्रयत्नपूर्वक सर्वोच्च अवस्था प्राप्त करणे शक्य आहे. थेरीगाथामध्ये ज्यांचे श्लोक संकलित केले गेले आहेत अशा अनेक भिक्कुणींनी अर्हतत्व प्राप्त केले होते.[iv]

सांची येथील शिलालेखांमध्ये अशा अनेक महिला उपदेशकभिक्कुणी आणि तपस्वींच्या नावांचा उल्लेख आहे की ज्यांचे स्वतःचे अनुयायी होते[v] बौद्ध धर्मातील व्यक्तीवादाच्या संकल्पनेने कदाचित स्त्रियांना आकर्षित केले असावे. बौद्ध तत्त्वांनुसार, एखाद्या व्यक्तीने त्याच्या किंवा तिच्या मोक्षाचा मार्ग स्वत:हून निवडला पाहिजे आणि यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी बौद्ध धर्म आहेच. एखाद्या व्यक्तीला स्वतःच्या प्रयत्नांनी आणि बाह्य मदतीशिवाय मोक्ष प्राप्त करता येतो हे बौद्ध धर्माशिवाय इतर कोणत्याही धर्मानेकधीही प्रकर्षाने सांगितलेले दिसत नाही. बुद्धाच्या मते, धम्म म्हणजे स्वतःची चेतना जी सावधगिरी, आकलन आणि सजगतेचा अभ्यास आहे. अशा प्रकारे बौद्ध धर्माने स्त्रीला पूर्ण व्यक्ती मानली. बौद्ध धर्मात अशी एकही प्रथा नाही की ज्यामध्ये स्त्रीला ब्राह्मण धर्माप्रमाणे तिच्या पुरुष जोडीदाराची साथ द्यावी लागते. हे स्पष्टपणे सूचित करते की लिंगभाव समानतेचे तत्व बौद्ध धर्मात खोलवर रुजलेले आहे.

सांची येथे महिलांनी स्वेच्छेने दान दिल्याचे लक्षात येते आणि शिलालेखांमध्ये त्यांची नावे कोरलेली आहेत.[vi] म्हणजे बौद्ध धर्माने स्त्रियांना स्वतःच्या अस्तित्वाचा, स्वत्वाचा शोध घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. जरी कुटुंबातील इतर सदस्यांसह देणगी दिली जात असली तरी, ते आपली नावे शीलालेखांमध्ये बिनधास्तपणे कोरून घेतात. हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे निश्चितच प्रकटीकरण आहे. पुरुषांच्या नावे देणग्या देण्यापेक्षा त्यांनी स्वतच्या नावाने या देणग्या दिल्याचे सांची येथे प्रकर्षाने लक्षात येते. सातवाहन राण्यांच्या नाशिक शिलालेखांमध्ये ही भावना अतिशय प्रभावीपणे व्यक्त केली आहे. जरी सातवाहन राजे ब्राह्मण धर्माचे समर्थक होते आणि गौतमीपुत्र सातकर्णी याला 'अद्वितीय ब्राह्मण' मानले जाते आणि त्याने वर्णसंकराला आळा घातला असे म्हटले जाते, तरी त्याची आई गौतमी बलश्री या बौद्ध संघाच्या महान संरक्षक होत्या. त्यांनी अनेक बौद्ध लेण्या तयार करून घेतल्याचे तेथील शिलालेखांवरून लक्षात येते.

बौद्ध धर्माने स्त्रियांना मानसिक-सामाजिक स्तरावर आवाहन केले. प्रेम आणि करुणा ही बौद्ध धर्मातील तत्वे स्त्रियांच्या अंगभूत स्वभावाच्या अगदी जवळची आहेत. बुद्ध नैतिक आचरणावर खूप भर देतात, आणि त्यामुळे केवळ या जगात आनंदी जीवन जगता येते असे नाही तर मृत्यूनंतर तो किंवा ती आनंदी गंतव्यस्थानावर पोहोचतात[vii]

बौद्ध धर्म स्त्रियांना त्यांची आध्यात्मिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अवकाश प्रदान करतो आणि गृहस्थांसाठी बुद्धाच्या शिकवणी गृहस्थ स्त्रीच्या कर्तव्यांशी पूर्णपणे जुळतात. बुद्धाने एका चांगल्या स्त्रीचे कर्तव्य सांगितले आहे की, तिने आपल्या पतीच्या आईवडिलांची काळजी घ्यावी आणि त्यांचा आदर करावा आणि एकांतवासाचा आदर करावा, घरगुती कामात कार्यक्षम व्हावे, सामान्य अनुयायी व्हावे, पंचशीलाचे पालन करावे आणि मुक्तपणे धम्मदान करावे.[viii]

अशाप्रकारे, ज्या वातावरणात स्त्रियांना नेहमीच सर्व प्रकारचे अधिकार नाकारले गेले होते आणि त्यांना कधीही योग्य तो सन्मान दिला गेला नाही, या पार्श्वभूमीवरबौद्ध धर्म हा स्त्री-पुरुष समानतेचा म्हणजेच लिंगभाव समानता असणारा धर्म म्हणून उदयास आला, जोप्रत्यक्षात सर्व प्रकारच्या समानता आणि प्रत्येकाला सन्मान प्रदान करतो. हा समानतेवर आधारित धर्म आहे आणि अष्टांग मार्गाच्या सहाय्याने दुःख कसे दूर ठेवायचे हे शिकवतो . हा धर्म किंवा ज्याला धम्म म्हटले जाते, तो नैतिकतेवर भर देतो आणि त्यामुळे प्रत्येकाला आनंदाने जगण्यास मदत करतो. साहजिकच,ब्राह्मणी धर्मात पिचलेले, दडपलेले लोक आपोआप पुढे आले आणि त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. तसेच

महिलांसाठी बौद्ध धर्मात अधिक चांगले स्थान असल्याने, योग्य तो सन्मान मिळत असल्याने आणि मुख्य म्हणजे लिंगभाव समानता असल्यामुळे मोठ्या प्रमाणात स्त्रिया बौद्ध धर्माकडे आकर्षित झाल्या. त्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला आणि  बौद्ध स्तूप, चैत्य, विहारांना त्यांनी मनसोक्त देणग्या दिल्या, हे सांची, कान्हेरी, नाशिक आणि नागार्जुनकोंडा येथील बौद्ध स्मारकांवरून स्पष्ट होते.

---

[i]बर्गेस जे. ए. एस., रिपोर्ट ऑन बुद्धिस्ट केव्ह टेंपल्स अँड देअर इंस्क्रिप्शन्स, 1883, भारतीय पब्लिशिंग हाऊस, वाराणसी, पृष्ठ क्रमांक 61.

[ii]बर्गेस जे. ए. एस., रिपोर्ट ऑन बुद्धिस्ट केव्ह टेंपल्स अँड देअर इंस्क्रिप्शन्स, 1883, भारतीय पब्लिशिंग हाऊस, वाराणसी, पृष्ठ क्रमांक 40.

[iii]जे. मार्शल, आणि ए. फाऊचर, मोनुमेंट्स ऑफ सांची 3 खंड. 1940, दिल्ली. पृष्ठ क्रमांक 124.

[iv]रियास डेव्हिड, स्लमस ऑफ सिस्टर्स, पाली टेक्स्ट सिरिज, 1909 पृष्ठक्रमांक 21, 16.

[v]जे. मार्शल, आणि ए. फाऊचर, मोनुमेंट्स ऑफ सांची 3 खंड. 1940, दिल्ली.पृष्ठ क्रमांक 312.

[vi]जे. मार्शल, आणि ए. फाऊचर, मोनुमेंट्स ऑफ सांची 3 खंड. 1940, दिल्ली. पृष्ठ क्रमांक 318.

[vii]दिघा निकाया, बर्मा पिटक असोसिएशन, 1984 वाराणसी, पृष्ठ क्रमांक, 150.

[viii]अंगुत्तरा निकाया, पाली मजकूर मालिका, 1985, लंडन, पृष्ठ क्रमांक, 295-298.

◆◆◆◆

